# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक १९/०६/२०२५

## पोलीस स्टेशन परशिवणी अंतर्गत खुनचा गुन्हा उघड ,अज्ञात आरोपीचा शोध घेवुन आरोपीला केली अटक

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक ०८/०६/२०२५ चे रात्री २१:०० वा ते २१:१५ वा. चे सुमारास मौजा खंडाळा (डुमरी) शिवारातील आशिर्वाद राईस मिल जवळील मनसर ते नागपुर एन.एच. ४४ रोड वरील भंडारा कॅनल चे पुला जवळ मृतक नामे **हिरालाल लक्ष्मण पुरे वय ५८ वर्ष रा. खंडाळा (डुमरी), ता. पारशिवनी** यांचा कोणीतरी अज्ञात आरोपीने, अज्ञात कारणाने, कोणत्यातरी धारदार हत्याराने त्यांचे गळ्यावर व पोटावर वार करुन त्यांना जिवानिशी ठार केले होते. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अज्ञात आरोपी विरूध्द अपराध क्रमांक २६०/२०२५ कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये खुनाचा गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाची उकल करण्याकरिता मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामिण जिल्हा यांचे मार्गदर्शनात श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखा व उपविभागातील पोलासांची वेगवेगळी तपास पथके तयार केली. सदर पथकांनी वेगवेगळया अंगानी व दिशेने गुन्हयाच्या तपासास सुरुवात केली. यातील मृतक हा त्यांच्या साथीदारांसह खमारी, उमरेड येथे शंकरपट पाहण्यासाठी गेला होता. तेथे त्यांच्यात काहीवाद विवाद होउन त्यांचा खून झाल्याची शक्यता गृहित धरुन पारशिवनी, रामटेक, देवलापार परिसरातून शंकरपट पाहण्यासाठी गेलेल्या लोकांकडे कसुन चौकशी करण्यात आली. तसेच घटनास्थळावर मृतक येण्यापूर्वी काही इसम तेथे दारु पित बसले होते, अशी माहिती मिळाल्याने एका पथकाकडुन त्याबाबत कसुन तपास केला असता, दारु पिणारे मृतक येण्यापुर्वीच तेथुन निघुन गेल्याचे निष्पन्न झाले. याशिवाय मृतक श्री. हिरालाल पुरे हे नुकतेच सेवानिवृत्त

झाले असल्याने त्यांचे बॅंक खात्यावर पेन्शन ची रक्कम जमा झाली होती. त्यामुळे घर कुटुंब किंवा गावातील मित्र परिवार यांचे सोबत त्यांचा काही वाद विवाद होता काय? याचीही चाचपणी करण्यात आली. त्यानंतर मयतास घटनास्थळा जवळील टपरीतील चाकुने मारले असल्यास त्या दिशेने तपास केला. येण्या—जाण्याच्या मार्गावरील व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी व काही साक्षीदारांची विचारपूस केली असता, एक इसम गाडीतील पेट्रोल संपल्याने घटनास्थळावर व फोडलेल्या टपरी जवळ घटने दरम्यान रेंगाळताना दिसल्याचे समजल्याने सीसीटीव्ही फुटेज मधील त्या संशयित इसमाचा फोटो साक्षीदारांना दाखवुन खात्री पटल्यानंतर त्या इसमाचा शोध सुरु केला. मनसर मध्ये त्या इसमाने काही लोकांशी संपर्क केल्याचे स्पष्ट झाल्याने त्या इसमांचा शोध घेउन त्यांचेकडे विचारपूस केली असता एका अनोळखी फोननंबरवर संशयिताने फोन केल्याचे उघड झाले. त्या फोन धारकाचा शोध घेउन विचारपूस केली असता संशयित इसम हा सुरज बिसन टेकाम रा.कच्चेखानी ता. खैरलांजी, जि. बालाघाट येथील असल्याचे निष्पन्न झाले. सदर इसम हा फिरतीवर मजुरी करतो व तो फोन वापरत नाही, असे माहीत झाल्याने त्याच्या छायाचित्रासह शोधपत्रिका सर्व सोशल मिडियावर प्रसारीत केली व सर्व पोलीस पाटील यांची बैठक घेउन संशयिताचा शोध घेण्याबाबत सक्त सुचना दिल्या.

दि.१८/०६/२०२५ रोजीचे रात्री सदर इसम हा मौजा चिचोली ता. पारशिवनी परिसरात लपुन बसलेला असल्याबाबत खबर मिळाल्याने पारशिवनी पोलीसांनी सापळा रचुन त्यास ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपीकडे गुन्हयासंदर्भात विचारपुस केली असता त्याने यातील मृतक इसम याचे कडे पेट्रोलकरिता २००/— रू. मागितले होते. मात्र मृतक हिरालाल पुरे यांनी पैसे न दिल्याने त्याचा राग आल्याने त्यास ठार मारल्याचे कबुल करुन त्याच्या खिशातील पैसे घेउन पेट्रोल टाकुन तो नागपुरला निघुन गेल्याचे सांगितले. पारशिवणी पोलीसांनी आरोपी **नामे सुरज बिसन टेकाम वय २४ वर्षे,रा. कुही** याला अटक केली. **अशा प्रकारे कौशल्यपुर्ण तपास करून पारशिवनी पोलीसांनी सदर गुन्हयात काहीही सुगावा नसतांना गुन्हयाची उकल करून आरोपीला अटक केले.**